19 SEP 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : जिल्ह्यात सोमवारी पावसाने हजेरी लावली. शिवाजी विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसरात दुपारी नयनमनोहर इंद्रधनुष्य अवतरले.

लोकसत्ता



गर्द पावसाळी वातावरण असताना शिवाजी विद्यापीठ परिसरात असे नयनमनोहर इंद्रधनुष्य साकारले गेले. (छाया – आलोक जत्राटकर)

पुढारी

# पर्यावरणाच्या नुकसानीबाबत उपाययोजना करा : डॉ. शिंदे

कोल्हापूर : आतापर्यंतच्या पिढ्यांनी केलेल्या पर्यावरण नुकसानीचे परिणाम तुम्हाला भोगावे लागणार आहेत. परंतु विज्ञान, तंत्रज्ञान व योग्य उपाययोजनांच्या मदतीने त्याला सामोरे जा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभागात, रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग सर्व्हिसिंग सेक्टर सोसायटी, इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग, रेफ्रिजरेटिंग अँड कंडिशनिंग इंजिनिअर्स व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ओझोन दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी प्रमोद माने प्रमुख उपस्थित होते. डॉ. आसावरी जाधव यांनी प्रास्ताविक, प्रमोद पुंगावकर यांनी मनोगत व्यक्त केले, डॉ. पल्लवी भोसले यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. चेतन भोसले यांनी आभार मानले.

पुढारी

# रोजगाराभिमुख ध्येयानेच रोजगार निश्चिती : डॉ. गुरव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अधिकचे ज्ञान, कौशल्य, क्षमता, वाचन याबरोबरच विद्यार्थ्यांनी रोजगाराभिमुख ध्येय निश्चित करून शिक्षण पूर्ण केल्यास रोजगार निश्चित मिळेल, असे प्रतिपादन विद्यापीठातील वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी केले.

विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) व एम.बी.ए. या अभ्यासक्रमातील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विद्यार्थी मेळाव्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे होते. प्रा. डॉ. गुरव म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणामुळे कौशल्यावर आधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केल्यास विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळणार आहे. प्रा. डॉ. कृष्णा पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख सहा. प्रा. दत्तात्रय कमलाकर यांनी करून दिली. सहा. प्रा. डॉ. प्रकाश बसवाणी बेळीकट्टी यांनी सूत्रसंचालन केले. सहा. प्रा. डॉ. नितीन रणदिवे यांनी आभार मानले.

सकाळ

# ध्येय निश्चित करून रोजगाराभिमुख शिक्षण घ्या

## प्रा. डॉ. ए. एम. गुरव : दूरशिक्षण केंद्रातर्फे माजी विद्यार्थी मेळावा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : अधिकचे ज्ञान, कौशल्य, क्षमता, वाचनाबरोबर विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून रोजगाराभिमुख शिक्षण घ्यावे. त्यातून निश्चित रोजगार मिळेल, असे शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी सांगितले.

विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम.,एम. एस्सी. (गणित), व एम.बी.ए. या अभ्यासक्रमाच्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे होते. प्रा. गुरव म्हणाले, 'नवीन शैक्षणिक धोरणामुळे कौशल्यावर आधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केल्यास विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळणार आहे.'

समन्वयक प्रा. कृष्णा पाटील यांनी प्रास्ताविक केले. दत्तात्रय कमलाकर यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रकाश बसवाणी बेळीकट्टी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नितीन रणदिवे यांनी आभार मानले.

पुढारी

# विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेला १,४४० विद्यार्थी उपस्थित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित उन्हाळी सत्र परीक्षेला १४४० विद्यार्थी उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठातर्फे मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी बॅचलर ऑफ फार्मसी, बीएड, एमएड, (एकात्मिक), मास्टर ऑफ एज्युकेशन आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.